

# महासागर अमरावती

पान 3

सोमवार दि. 16 सप्टेंबर 2024


## अस्वलीच्या हल्ल्यात गुराखी गंभीर

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, (दि. 15) –** चिखलदरा तालुक्यातील रायपूर गावाच्या जंगल परिसरातवन खंड क्रमांक233 मध्येगावातील गुराखी सोमाजी भुऱ्या सावलकर वय 55 राहणार रायपूर हा 55 वर्षीय व्यक्ती गुरे करण्यासाठी जंगलामध्ये गेला होता गुरेचारतानी दुपारी दोनच्या व अडीच च्या दरम्यानअस्वलीने अचानक हल्ला केला व



गुराख्याला जखमी केलेअस्वलीच्या तावडीतून कसे बसे त्याला सोडवण्यात आले व प्राथमिक उपचारासाठी सेमाडोह प्राथमिक आरोग्य केंद्रात भरती करण्यात आले प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी त्याला अमरावती येथे रेफर करण्यात आले असून त्याच्या डोक्यावर उजव्या पायावर डोळ्यावर जखमा असल्याची माहितीअसून त्याला पुढील उपचारासाठी अमरावती येथे रेफर करण्यात आले आहे

# मराठी भाषा विद्यापीठासाठी 4.25 कोटी मंजूर

## वस्तीगृह, कार्यालय, वर्ग खोल्यांची होणार निर्मिती

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.15 )–** महानुभाव पंथाची काशी असणाऱ्या आणि लीळाचरित्र हा मराठी भाषेतला पहिला आद्यग्रंथ ज्या ठिकाणी लिहिण्यात आला त्या अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यात येणाऱ्या महानुभाव पंथाची काशी अशी ओळख असणाऱ्या रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठाच्या उभारणीला लवकरच गती येणार आहे. 11 सप्टेंबरला राज्य शासनाने काढलेल्या तीन स्वतंत्र शासन निर्णयात मराठी भाषा विद्यापीठाच्या इमारतीसाठी 4.25 कोटी रुपयांची मान्यता दिली आहे. या निधीतून विद्यापीठ परिसरात विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह, कार्यालय, वर्ग खोल्या यांची निर्मिती केली जाणार आहे.



रिद्धपूर विकास आराखडा अंतर्गत बांधण्यात आलेल्या भक्तनिवास इमारत, थीम पार्क इमारत तसंच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या यात्री निवास बहुउद्देशीय सभागृह आणि ध्यान केंद्र या इमारतीमध्ये मराठी भाषा विद्यापीठ तात्पुरत्या स्वरूपात सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या भक्त निवास इमारतीमध्ये मुलामुलींचे वसतीगृह निर्माण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले असून त्यानुसार मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या भक्त निवास इमारतीमध्ये मुला-मुलींचे वसतीगृह निर्माण करण्याच्या कामास एक कोटी 75 लक्ष 35 हजार रुपये इतक्या किमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. राठी भाषा विद्यापीठाच्या रिद्धपूर येथील थीम पार्क इमारतीमध्ये कार्यालय तसंच वर्ग खोल्या उभारण्यात येणार आहेत. त्यासाठी 54 लाख 50 हजार इतक्या किमतीच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली. हे काम पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत येत असल्यामुळे संबंधित विभागाची व तत्सम प्राधिकरण यांची पूर्वपरवानगी घेण्याची सूचना उच्च व तंत्र शिक्षण विभागाने केली आहे. मराठी भाषा विद्यापीठातील इमारतीसाठी फर्निचर व तत्सम वस्तू खरेदी करण्याच्या कामासाठी एक कोटी 96 लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. त्यातून सुमारे 51 प्रकारच्या वस्तू घेण्यात येणार आहेत हे काम पूर्ण झाल्यानंतर पुढील शैक्षणिक वर्षापासून मराठी भाषा विद्यापीठाचे कामकाज सुरू होईल.

### डॉ. अविनाश आवलगावकर विद्यापीठाचे कुलगुरू

मराठी भाषा विद्यापीठ अधिनियम 2023 मधील कलम 87 नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने 3 सप्टेंबर 2024 रोजी डॉ. अविनाश आवलगावकर यांची रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून नियुक्ती केली. कुलगुरूंचा कालावधी हा एक वर्षासाठी किंवा कुलपतींद्वारे कुलगुरूंची नियमित नियुक्ती केली जाईपर्यंत यापैकी जो अवधी अगोदर पूर्ण होईल तोपर्यंत राहणार असल्याचे देखील शासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

## 80 वर्षाचा जीवनप्रवास एकाच दिवशी संपला!



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.15 )–** वृद्ध पत्नीच्या मृत्यूनंतर काही तासातच पतीचेही निधन झाल्याची घटना दर्यापूर येथील तेलीपुरा येथे घडली. 80 वर्षाचा जीवनप्रवास संपवणारे पांडुरंगसा शहाळे व त्यांच्या पत्नी शांताबाई शहाळे या दांपत्यावर (दि.16) सोमवारी सकाळी 11 वाजता येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

शांताबाई शहाळे (वय 95 वर्ष) यांचे (दि. 15) रोजी रविवारी दुपारी 2 वाजता दरम्यान निधन झाले. निधनाची बातमी नातेवाईकांना देण्यात आली. गावातील नातेवाईक शहाळे यांच्या घरी येण्यास सुरुवात झाली, तोच शांताबाई यांचे पती पांडुरंगसा शहाळे (वय 105 वर्ष) यांना पत्नीच्या निधन झाल्याचे कळताच काही तासातच त्यांचेसुद्धा निधन झाले. गेल्या 80 वर्षाचा जीवनप्रवास एकाच दिवशी संपल्याने शहाळे परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला. दर्यापूर शहरात या बातमी ने दु:ख व्यक्त करण्यात येते आहे. त्यांच्या मागे एक मुलगा, चार मुली, नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

## आरोपीच्या घरात पोलीसांशी धक्काबुक्की

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.15 ) –** एका गुन्ह्यातील आरोपीला पकडण्यासाठी गेलेल्या पोलीस पथकाशी बाचाबाची करून, एका हवालदाराची कॉलर पकरण्यात आली आणि आरोपीला नेण्यास अटकाव करण्यात आला. त्यामुळे आरोपीने पलायन केले. ही घटना शिरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नेरपिंगळाई येथील पांडेपुरा येथे 13 सप्टेंबर रोजी सायंकाळी 5 वाजता घडली होती. याप्रकरणात पोलीस हवालदार मनोज कळसकर (रा. मोर्शी) यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपी राहुल रमेश पांडे, प्रशांत पांडे, देवेंद्र इंगळे व एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

शिरखेड पोलीस ठाण्यात पांडेपुरा येथील राहुल रमेश पांडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामुळे त्याला पकडण्यासाठी पोलिस हवालदार मनोज



कळसकर हे पोलिसांच्या पथकासह त्याच्या घरी होते. पोलिसांनी आरोपी राहुल पांडे याला अटक केली. परंतू यानंतर त्याच्या कुटुंबीय प्रशांत पांडे, देवेंद्र इंगळे व एका महिलेने पोलिस कर्मचार्याशी वाद घालत धक्काबुक्की केली. त्याने एका पोलिस कर्मचार्याला कॉलर पकडून ढकलले.

याचा फायदा घेत आरोपी राहुल पांडे येथून पळून गेला. यानंतर मनोज कळसकर यांनी शिरखेड पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दिली आहे. शिरखेड पोलिसांनी राहुल पांडे, प्रशांत पांडे, देवेंद्र इंगळे व एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## गुटखा तस्कर तेजवाणी बधुंना अटक

### गुटखा व कारसह सहा लाखांचा माल जप्त



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.15 ) –** मध्यप्रदेशातून अमरावती जिल्ह्यात गुटख्याची तस्करी सुरु असल्याचे प्रकार आता उघड होऊ लागले आहे. दोन दिवसांपूर्वीच धारणी पोलिसांनी गुटख्याची मोठी खेप पकडली आहे. अशातच 14 सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी गुटख्याची वाहतुक करणार्या कारला पकडून, दोन आरोपींना अटक केली आहे. सुरज राजकुमार तेजवाणी (32) व गोपाल राजकुमार तेजवाणी (31, दोन्ही रा.लालपुल, परतवाडा) अशी आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून कारसह लाखो रुपयांचा गुटख्या मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिस अधिक्षक विशाल आनंद यांनी मध्यप्रदेश सिमेवरून अमरावती जिल्ह्यासह महाराष्ट्रात होणार्या गुटखा तस्करीवर बारकाईने लक्ष देवून कारवाई करण्याचे आदेशीत केले होते. या अनुषगांने 14 सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना गुप्त माहीती मिळाली, की, एका ग्रे रंगाच्या कारची मध्यप्रदेशातून परतवाडा येथे अवैधरित्या प्रतिबंधीत गुटखा वाहतुक करुन येणार आहे. या माहितीवरून पोलिस पथकाने मध्यप्रदेश- महाराष्ट्र सिमेवरील घटांग ते परतवाडा रोड्वर सापळा रचला. त्यावेळी पोलिसांनी घटांगकडून परतवाडाकडे येणार्या ग्रे रंगाच्या कारला थांबवून, कारची पाहणी केली असता कारमध्ये दोन इसम बसुन होते. पोलिसांनी कारची झडती घेतली असता, त्यात गुटखा आढळून आला. त्यामुळे पोलिसांनी कारमधील दोघांनाही ताब्यात घेतले. दोन्ही आरोपींना परतवाडा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास परतवाडा पोलिस करीत आहेत. सदरची कारवाई पोलिस अधिक्षक विशाल आनंद, अप्पर पोलिस अधिक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक सचिन पवार, पोलिस अमलदार युवराज मानमोठे, रविंद्र वर्हाडे, स्वप्नील तंवर, सागर नाठे, शाताराम सोनोने, चालक हर्षद घुसे यांनी केली.

### मध्यप्रदेशातून आणला माल

पोलिसांनी कारची पंचासमक्ष झडती घेतली असता कारमध्ये 2 लाख 4 हजार 100 रुपये किमंतीचे हॉट प्रीमीयम, विमल व पानपराग नावाचे गुटखा पाकिट मिळून आले. पोलिसांनी आरोपींना गुटख्याबाबत विचारणा केली असता त्यांनी सदर गुटखा मध्यप्रदेशमधुन कमी किंमतीत आणुन परतवाडा शहरात कमी भावात विक्री करण्याकरीता आणल्याचे सांगितले. यावरून दिसून येते की, मध्यप्रदेशातून गुटख्याचा मुद्देमाल परतवाडासह अमरावती जिल्ह्यात विक्री होत आहे. पोलिसांनी गुटखा आणि एमएच 01 एएच 9585 या क्रमांकाची कार असा एकुण 6 लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## वायरमन, खाजगी मजूर विद्युत प्रवाहाने जखमी

### चांदूर रेल्वेत दोन वेगवेगळ्या घटना

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे ( दि.15 ) –** शहरातील महावितरणचे कंत्राटदार व अधिकार्यांच्या हलगर्जीपणामुळे शहरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी काम करत असताना महावितरणचे वायरमन पियुष चराडे व कंत्राटदाराचा एक मजूर 11 केव्ही विजेचा शॉक लागून गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर अमरावती येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

शहरातील शिक्षक वसाहतीत एमएसईबी कंत्राटदाराकडे काम करणारे मजूर देखभालीचे काम करत होते, तर पियुष हा चरडे क्रीडा संकुलाजवळील डीपीमध्ये काम करीत होता. तर मुंबईत एका खासगी कंपनीचे कर्मचारी मीटर बदलण्याचे काम करत होते. मात्र परस्पर समन्वयाअभावी अचानक एकाने बंद 11 केव्ही एबी स्वीच चालू केल्याने विजेच्या खांबावर काम करणारे ठेकेदाराचे मजूर विजय गोधणे व डीपीवर काम करणारे वायरमन पियुष चरडे हे गंभीर जखमी झाले. विजेचा धक्का लागल्याने आजूबाजूच्या लोकांनी चरडे वायरमनला डॉ.जाजू यांच्याकडे नेले तर दुसरीकडे खांबावरून पडून गंभीर जखमी झालेल्या ठेकेदाराचे कामगार गोदाणे यांना उपचारासाठी प्रथम डॉ.वाघ यांच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. दोघांनाही अमरावती येथील खासगी रुग्णालयात नेण्यात आले. त्याच्यावर नुकतेच उपचार सुरू झाले आहेत. पण एबी स्विच कोणी चालू केला? एबी स्विच बंद असताना ते लॉक का केले नाही? त्या डीपीवर कर्मचारी का तैनात करण्यात आले नाही? लाइन सुरू करण्यापूर्वी फोनवर का बोलू नये? असे अनेक प्रश्न या घटनेनंतर निर्माण झाले आहेत. या सर्व घटनांना अधिकारी किंवा ठेकेदार जबाबदार कोण, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

## अंबाडा येथे सार्वजनिक व घरगुती गणेशाचे विसर्जन

### सात दिवसाच्या गणपतीची परंपरा

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि.15 )–** तालुक्यातील अंबाडा येथील 16 सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आणि घरगुती गणेश मूर्तींचे विसर्जन शनिवारी 14 सप्टेंबरला उत्साह पूर्वक वातावरणात विसर्जन करण्यात आले. रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी दूरून आलेल्या गणेश भक्तांमुळे अंबाडा गावाला यात्रेचे स्वरूप आले. जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तालुक्यातील असदपूर व मोर्शी तालुक्यातील अंबाडा येथे सात दिवसाच्या गणपतीची परंपरा आहे.

यावर्षी गावात सार्वजनिक सोळा गणेशोत्सव मंडळे होती. श्री शिवाजी गणेश मंडळ, महात्मा फुले गणेश मंडळ, क्रांती गणेश मंडळ, नवराष्ट्र गणेश मंडळ, बाळकृष्ण गणेश मंडळ,



सामुदायिक गणेश मंडळ, सावता गणेश मंडळ, एकता गणेश मंडळ, प्रभात गणेश मंडळ, रामराज्य निर्भय गणेश मंडळ, मुदगलेश्वर महाराज गणेश मंडळ, आदिवासी गणेश मंडळ, गजानन सर्वोदय गणेश मंडळ, रामदेव बाबा गणेश मंडळ, गजानन बाल गणेश मंडळ या 16 गणेश मंडळांनी गावातून मिरवणूक काढून गणेश विसर्जन केले.

सालाबादप्रमाणे गेल्या 40 वर्षापासून सुरू असलेली या गावातील जातीय सलोखा कायम ठेवणे आणि सर्वधर्मसमभावाची परंपरा याही वर्षी तशीच दिसून आली.

गणेशोत्सव मंडळांची मिरवणूक जामा मज्जिद पासून जाते यावेळी गावातील चाळीस वर्षांपूर्वी तात्कालीन सरपंच विजयभाऊ खोडस्कर आणि तात्कालीन पोलीस पाटील दानिशअली पटेल यांनी सर्वधर्मसमभाव आणि जातीय सलोखा गावात टिकून राहावा म्हणून एक परंपरा लावून दिली आहे. ती म्हणजे जामा मजीद जवळ गावातील माजी पोलीस पाटील दानिशअली पटेल, कार्यरत पोलीस पाटील सुनील चव्हाण, सरपंच सौ रुपाली कडू, अमोल कडू, ग्रामविकास अधिकारी विनोद लोखंडे यांनी मंडळाच्या अध्यक्षांना शाल व श्रीफळ देऊन सन्मानित केले. तर मंडळाच्या अध्यक्षांनी मुस्लिम संत शासरअली बाबा यांचे दर्ग्यावर फुलांची चादर चढून सर्वधर्मसमभावाचा परिचय दिला. जिल्ह्यात सर्वप्रथम होणाऱ्या या गावच्या गणेश विसर्जनामुळे येथे दूर दुरून येणाऱ्या दिंड्या ढोल पथक ताशे म्युझिकल डीजे चा आनंद घेण्यासाठी गावोगावचे गणेश भक्त दाखल होतात. त्यामुळे गावात यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. त्यामुळे पोलिसांवर ताण पडतो. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी मोर्शी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश पांडे यांचे मार्गदर्शनात 4 पोलीस निरीक्षक 14 पोलीस उपनिरीक्षक तथा सहायक उपनिरीक्षक100 अंमलदार आणि 25 होमगार्ड यांचा बंदोबस्त ठेवला होता.



## ईद-ए-मिलाद उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील वाहतूक मार्गात बदल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.13 )–** अमरावती शहरात 16 सप्टेंबर रोजी (एक दिवस मागे-पुढे चंद्र दर्शनानुसार) मुस्लीम बांधवाचे ईद-ए-मिलाद निमित्त मिरवणुक काढण्यात येतात. या कालावधीत मुख्य रस्त्यावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक मार्गात बदल करण्यात आले आहेत.

ज्यामध्ये ट्रांसपोर्ट नगर ते नागपुरी गेट चौक या मार्गावर मिरवणुक काळात सर्व प्रकारच्या जड वाहनांना प्रवेश बंद राहील. इतर हलक्या वाहनांची एकतर्फा वाहतुक सुरू राहील. चित्रा चौक ते पठाण चौक या मार्गावर मिरवणुक काळात सर्व प्रकारच्या जड वाहनांना प्रवेश बंद राहील. इतर हलक्या वाहनांची वाहतुक प्रभात टॉकीज व दीपक चौक मार्गे वळविण्यात येईल. हनुमान नगर पोलीस चौकी ते पठाण चौक या मार्गावर मिरवणुक काळात सर्व प्रकाराचा जड वाहनांना प्रवेश बंद राहील. इतर हलक्या वाहनांची वाहतुक महाजनपुरा मार्गे वळविण्यात येईल.

जवाहर गेट ते टांगा पडाव या मार्गावर मिरवणुक काळात सर्व प्रकारच्या जड वाहनांना प्रवेश बंद राहील. इतर हलक्या वाहनांची वाहतुक सराफा- गांधी चौक- जयस्तंभ मार्गे वळविण्यात येईल. लालखडी ते पठाण चौक या मार्गावर मिरवणुक काळात सर्व प्रकारच्या जड वाहनांना प्रवेश बंद राहील. इतर हलक्या वाहनांची वाहतुक लालखडी रिंगरोड मार्गे वळविण्यात येईल.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४



महासागर अमरावती

सोमवार दि. 16 सप्टेंबर 2024

# गौरखेडा कुंभीमध्ये घरकुल घोटाळ्याची शक्यता?

## निष्पक्षपणे चौकशी होणे गरजेचे

## पंचायत समितीकडून दुर्लक्ष

**संतोष भालेराव**

**परतवाडा,( दि.15 )-** येथूनच जवळ असलेल्या गौरखेडा कुंभी ग्रामपंचायत अंतर्गत लोकसंख्येच्या प्रमाणात प्रधानमंत्री आवास, मोदी आवास (फक्त ओबीसी) योजनेतंर्गत घरकुलाचा लाभ जास्तीत- जास्त गरजू व पात्र लाभार्थी लोकांपर्यंत मिळवण्यासाठी खुपचं ओढतान होताना दिसत आहे. सर्व निकष, नियमांना बगल देऊन येथील ग्रामसेवक, रोजगार सेवक, ग्रामपंचायत सदस्य व पदाधिकारी हे सगळे आपापल्या जवळचे नातेवाईक व मित्रांना गैर कायदेशीर मार्गाने वेळ पडल्यास बनावट कागदपत्रे तयार करून सुद्धा खोट्या लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास/मोदी आवास योजनेंतर्गत लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत व भरपूर लोकांना नातेवाईकांना मित्रमंडळींना मिळवूनही दिल्याचा आरोप होत आहे.





2022 च्या ग्रामसभेत ठरविल्याप्रमाणे प्राधान्यक्रम पात्र लाभार्थी यादीमध्ये तत्कालीन रोजगार सेवक, ग्रामसेवक व सदस्यांनी पुर्णपणे घोळ करून अनुक्रमे नावे न घेता आपल्या मर्जीतील लोकांना खिरापत वाटल्यासारखे वाटतं सुटले आहेत. त्यामुळे अनेक गरजू व पात्र लाभार्थ्यांना डावलण्यात आले आहे. या प्रकाराची चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

एका गावातील नागरिकाने आवास योजनेंबद्दल विचारले असता ते म्हणाले की मला प्रधानमंत्री आवास योजना( मोदी आवास) बाबत काहीच माहिती नाही. तुमच्या वार्डातील ग्रामपंचायत सदस्यांना विचारा तुमचे त्यांच्या सोबत पटत नाही का? कारण की घरकुला बाबतीत सर्व अधिकार ग्रामपंचायत सदस्यांनाच आहेत तेच मासिक सभेत ठरवतात. कोणाला द्यायचे कोणाला नाही परंतु त्या नागरिकाने पंचायत समिती अचलपूर येथील घरकुल बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांकडे चौकशी केली असता व काल परवा पंचायत समिती अचलपूर येथे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहोपात्रा दौऱ्यावर आल्या असता त्यांनी सांगितले की एक वेळ ग्रामसभेत मंजूर केलेल्या ठरावानुसार यादीत कोणत्याही प्रकारचे बदल केले जाऊ शकत नाहीत, जर एक आयएएस अधिकारी सांगतात की यादीत बदल होत नाही, नाव खाली वर करू शकत नाही, तर गौरखेडा कुंभी ग्रामपंचायत मधील ग्रामसेवक, रोजगार सेवक, सदस्य व पदाधिकारी यांनी हे कसं शक्य करून दाखवले हे ऐकून गौरखेडा कुंभी येथील नागरिकांना आश्चर्याचा धक्काच बसला आहे! अनू क्रमांका नूसार यादीतील गरजूंना घरकुला पासून वंचित ठेऊन तत्कालीन रोजगार सेवक ग्रामसेवक व सदस्यांनी ज्या नागरिकांचे घर पक्के आहे, त्यांचे कच्चे घर दाखवून नमुना आठ अ उतारा रजीस्टर मध्ये खाडाखोड करून व इतर बनावट कागदपत्रे लावून पंचायत समिती येथील कर्मचाऱ्यांच्या डोळ्यात धूळफेक करीत गैर कायदेशीर मार्गाने बनावट लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत लाभ मिळवून देण्यात आल्याची माहिती आहे.



सात वर्षांपासून प्रतिक्षा यादीत ( ओबीसी ) असलेल्या ख- या लाभार्थी चे घर.

काही ठिकाणी एका बनावट लाभार्थ्यांला घरकुल बांधकाम न करताच शासकीय निधीतून घरकुल बांधण्यासाठी मिळणारे पैसे काढून दिले आहेत, त्याच्या नावाने ग्रामपंचायत कार्यालयात नमुना आठ अ उतारा रजीस्टर मध्ये नोंद नसताना याला घरकुलाचा लाभ कसा मिळाला? याने घर कुठे बांधले? याचा शोध गावातील लोक घेत आहेत, तर गरजूंना पात्र लाभार्थ्यांना मात्र 2022 पासून पात्र लाभार्थ्यांच्या यादीत नाव असताना ग्रामपंचायतीचे उंबरठे झिजवावे लागत आहे.

या सर्व प्रकरणात गौरखेडा कुंभी ग्रामपंचायत कार्यालयातील दप्तर तपासणी दरम्यान घोटाळा समोर येण्याची शक्यता आहे.

# चिचोक्याच्या गणपती झाला 85 वर्षांचा

## करजगाव येथील गणेशमुर्ती भक्तांचे श्रध्दास्थान

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.15 )-** करजगाव येथील चिचोक्याच्या गणपतीला 85 वर्षाचा प्रगल्भ इतिहास लाभला आहे. निसर्गपूरक असलेली ही मूर्ती हस्तकलेचा हा सर्वोत्कृष्ट नमूना आहे. करजगाव येथील गणेशमुर्ती ही भक्तांचे श्रध्दास्थान आहे.

85 वर्षापूर्वी चिचोक्यापासून महाबली पवनसुत हनुमान व गरुड व गणेशमुर्तीचे निर्माण करण्यात आले होते. वर्षभर या तिन्ही मूर्त्या स्थानिक मंदिरात विराजमान असतात. परंतू गणेशोत्सवादरम्यान त्यांची दहा दिवस मंडपात स्थापना करुन भक्तिभावात पूजा अर्चा केल्या जाते. विसर्जन मिरवणुकीत रथात मिरवणुक काढल्या जाते. विसजर्न मिरवणुकीत तृतीय पंथीयांचा सहभाग ही देखील स्थापने पासूनच वैशिष्टपूर्ण परंपरा आजही कायम आहे. कोरोना काळ वगळला तर ही परंपरा अशीच सुरु आहे. करजगाव लोखंडेपुरा स्थित गजानन महाराज संस्थानाने आपली गणेशोत्सवाची परंपरा कायम ठेवत 85 व्या वर्षात पदार्पण केले आहे.





### करजगाव चे गणेश विसर्जनाचीही विशेषत

गणपती म्हटले तर संपूर्ण जिल्हाच नव्हे तर जिल्ह्याच्या बाहेरच्या मंडळीना करंजगाव ची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. येथील गणेश विसर्जन हे येथील विशेष आकर्षण आहे. आधी गेल्या काही वर्षाआधी रात्रभर मिरवणूक चालायची, त्यात तृतीयपंथीयांचे नृत्य, ढोलकी, बासरी सारखे पारंपरिक वाद्य, ढोलताशे वापरले जायचे.

### गुरु शिष्याने केले मुर्त्यांचे निर्माण

गुरू-शिष्यांनी हस्तकलेने निर्माण केलेल्या या तिन्ही मूर्त्या आजही आकषर्णाचे केंद्र बनल्या आहेत. संस्थानात गणेश भक्तांची दर्शनाला रिघ असते. 85 वर्षापासून करजगाव येथील रायजीबाई खेरडे या धाकट्या बहीणीकडे शिरजगाव कसबा येथे पाहुण्या गेल्या असत्या तेथील सटवाईपुऱ्यातील मनमोहक गणेशमूर्ती पाहून त्या भारावून गेल्या होत्या. त्यांनी त्यावेळी तेथील मुर्तीकारास तशीच मूर्ती तयार करून देण्याची विनवणी केली. मूर्तिकार गंगाराम वांगे व त्यांचे करजगाव येथील शिष्य बळीराम कविटकर यांनी कोणताही मोबदला न घेता चिचोक्यांपासून तयार केलेल्या या मुर्त्या करजगाव येथील श्री गजानन महाराज संस्थानला दान दिल्या. तेव्हापासून आजतागायत करजगाव येथे गणेशोत्सवात याच गणपतीची स्थापना करण्याची परंपरा संस्थानने पाळली. अशी निसर्गपुरक असलेली मुर्ती कोठेच आढळत नसावी. चिंचोके, कागदाचा लगदा, सिरस, ताग व माती वापरून 15 सप्टेंबर 1939 रोजी गुर्रू-शष्यांनी अप्रितर्मा शल्प तयार केले. अशा मूर्ती करजगाव व शिरजगाव वगळता देशात कोठेही नसल्याचा दावा गावकऱ्याकडून केला जातो.

# लैंगिक अत्याचारातील आरोपीला अटक

**अमरावती -** महिलेवरील लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यातील एका आरोपीला अटक करण्यात खोलापुरी गेट ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण (डी.बी) पथकाला 13 सप्टेंबर रोजी यश मिळाले. शेख तौसीफ शेख अकबर (24, रा. हैदरपुरा, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर खोलापुरी गेट पोलिसांनी आरोपीस 24 तासाचे आत अटक केली आहे. महीलेला लग्नाचे आमीष दाखवुन तिच्यावर वांरवार लैंगिक अत्याचार करण्यात आला.

# अल्पभूधारक शेतकऱ्याची विषप्राशन करून आत्महत्या

## माहुली धांडे येथील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर ( दि. 15 ) -** कर्जाचे डोंगर, नापिकीसह दोन मुलींचे वैद्यकीय शिक्षण अशा काही मानसिक तणावातून अल्पभुधारक शेतकर्याने विषप्राशन करून आत्महत्या केल्याची घटना माहुली धांडे परिसरात 14 सप्टेंबर रोजी उघडकीस आली. सुधाकर चंपतराव धांडे असे मृताचे नाव आहे.

दर्यापूर तालुक्यातील माहुली धांडे येथे शनिवारी दुपारी अडीच वाजताच्या सुमारास अल्पभूधारक शेतकरी सुधाकर चंपतराव धांडे यांनी आपल्या आसेगाव रोडवरील शेतात विष प्राशन करून आत्महत्या केली. या घटनेच्या माहितीवरून पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पुढील कायदेशिर कारवाई केली. सुधाकर धांडे यांच्या मालकीची 1 एकर 20 गुंठे शेती असून शेतीवरील बँकेचे कर्ज, शेती मशागतकरीता आणलेले व्याजाचे पैसे, पावसामुळे शेतीचे झालेले नुकसान नुकसान आणि वाढत जात असलेला कर्जाचा डोंगर अशा काही कारणास्तव सुधाकर धांडे यांनी आपली जीवन संपविले आहे. सुधाकर धांडे यांना दोन मुली असून मोठी वैद्यकीय शिक्षण (एमबीबीएस)अंतिम वर्षाला असून लहान वैद्यकीय शिक्षण प्रवेश परीक्षा (नीट) तयारी करत आहे. त्यांचे मागे पत्नी, दोन मुली असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

### शासनाने मदत करावी

या घटनेने गावात शोककळा पसरली असून सदर शेतकर्याच्या कुटुंबाला शासनाने मदत करावी, अशी मागणी ग्राम पंचायत उपसरपंच सतीश पाटील साखरे, माजी सरपंच विजू पाटील साखरे यांनी केली आहे. 15 सप्टेंबर रोजी सुधाकर धांडे यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणामध्ये माऊली धांडे येथे अंतिम संस्कार करण्यात आले. याप्रसंगी संपूर्ण गाव हळहळ व्यक्त होत आहे.


# सहा महिन्यांपासून बस थांबा परिसर अंधारात

## पथदिवे ठरत आहे 'शो पीस'

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.15 )-** अमरावती-वरुड महामार्गावर स्थित हिवरखेड येथील मुख्य बस थांबा परिसरातील पथदिवे शो पीस ठरत आहे. जवळपास सहा ते सात महिन्यांपासून हे पथदिवे बंद असल्यामुळे येथे सध्या अंधाराचे राज्य आहे.

हिवरखेड मुख्य थांब्यावरून श्री क्षेत्र सालबर्डी येथेसुद्धा रस्ता जातो. तसेच श्री क्षेत्र सालबर्डी येथे विविध राज्यातून भाविक महादेवाच्या दर्शनासाठी येतात. नागरिक स्वत:च्या मालकीच्या गाडीने तसेच, गाड्या भाड्याने करून दर्शनासाठी गर्दी करतात मात्र हिवरखेड मधील मुख्य बसस्टॉप वरील पथदिवे बंद असल्यामुळे रात्री येणाऱ्या भाविकांना तसेच परिसरातील नागरिकांना



अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामध्ये अजून भर म्हणून 'हिवरखेड' गावाच्या नावाचा फलक सुद्धा गायब असल्यामुळे हिवरखेड मध्ये आल्यावर सुद्धा सालबर्डी येथे जाणाऱ्या भाविकांच्या गाड्या रस्ता चुकत आहे आणी दुसऱ्या गावाकडे जाताना दिसत आहेत. आणि रस्ता चुकले हे लक्षात आल्यावर त्यांना परत हिवरखेड बस थांब्यावर यावे लागते. अशा प्रकारचा मानसिक त्रास नाहकच भाविकांना होत आहे. या पथदिव्यांना महाराष्ट्र वीज वितरण कंपनी कडून विद्युत पुरवठा करण्यात येतो, आणि पथदिवे देखभालीचे काम एच.जी. इन्फ्रा कंपनी कडे आहे. परंतु या पथदिव्यांचे तीन महिन्याचे बिल हे 82 हजार रुपये झाल्याचे येथील कनिष्ठ अभियंता शहानवाज अंसारी यांनी सांगितले. हे बिल एच.जी.इंफ्रा कंपनी कडे असल्याचे सांगितले आहे. तरी एच.जी.इंफ्रा कंपनीने त्वरित वीज बिल भरुन पथदिवे सुरू करावे अशी विनंती हिवरखेड तसेच परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे. एच.जी.इन्फ्रा कंपनी ला वीजवितरण कंपनी कडून नोटीस बजावण्यात आली होती, तसेच पत्रव्यवहार सुध्दा केल्याचे सांगण्यात आले आहे. परंतु एच.जी. इन्फ्रा कंपनी कडून कुठल्याही प्रकारचे उत्तर मिळाले नसल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले. त्यामूळे लवकरात लवकर पथदिवे सुरू न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा हिवरखेडवासियांनी दिले आहे.

# विहिरीतील पाण्यात बुडून 80 वर्षीय वृध्दाचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.15 )-** नांदगाव पेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जळका शहापूर स्थित गावठाण विहिरीत एका 80 वर्षीय वृध्द इसमाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. किसन मंगल घरडे (80, रा. जळका शहापूर) असे मृताचे नाव आहे. या घटनेची माहिती भारत किसनराव घरडे (50, रा. जळका शहापूर) यांनी 14 सप्टेंबर रोजी नांदगाव पेठ पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. भारत घरडेंच्या माहितीनुसार, त्यांचे वडिल किसन घरडे यांना मानसिक आजार होता. त्यांची प्रकृती बरी नसल्याने उपचार सुरु होता. दरम्यान ते कोणालाही न सांगता घरातून निघून नेले. त्यावेळी त्यांचा शोध घेतला, परंतू ते मिळून आले नाही. दरम्यान गावातील विहिरीजवळ त्यांची चप्पल, दुपट्टा व काठी मिळून आली. त्यानंतर या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी अग्निशमन दलाच्या मदतीने किसन घरडेंचा मृतदेह बाहेर काढला.

# वाळूचे अवैध उत्खनन, वाहतूक रोखण्यात प्रशासन अपयशी?

## तस्करांवरील फौजदारी कारवाई मंदावली





**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार,( दि.15 )-** तालुक्यातील अनेक भागातून अवैध वाळू उत्खनन आणि वाहतूकीच्या प्रकरणांमध्ये चांगलीच वाढ झाली आहे. मात्र प्रशासन या वाळू तस्करीला थांबविण्यास अपयशी ठरत आहे. वाळू तस्करांवर होणारी फौजदारी कारवाईसुध्दा मंदावली आहे. संपुर्ण जिल्ह्यात चांदुर बाजार तालुका हा अवैध वाळू उपस्याकरिता नेहमी चर्चेत असतो, या वाळू तस्करांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी शासनाचे प्रयत्न अयशस्वी ठरत आहे.

तालुक्यातील कुरळपूर्णा, करजगाव, शिरजगाव कसबा, घाटलाडकी, देऊरवाडा, आसेगाव, करजगाव, बोदड बहिरम, फुबगाव, विश्रोळी, बेलोरा येथील राजकीय पांढरपेशे माफियांचे भरणपोषण करण्याकरिता एक कलमी कार्यक्रम राबवित आहेत. ग्रामीण भागात वाळूसाठा असलेल्या परिसरातील शेतकरी आर्थिक अमिषाला बळी पडून गुप्तता पाळण्यातच धन्यता मानतात. जीवाच्या भीतीने स्थानिक या विरोधात 'ब्र' शब्द काढत नाही. झटपट पैसा कमावण्यासाठी अवैध वाळू वाहतूकीला ग्रामीण भागात जणू पेव फुटलेले आहेत. मागणी अधिक व पुरवठा कमी असल्याने वाळूचे भाव दिवसेंदिवस गगनाला भिडले आहेत. काही संघटना, व्यक्ती हे संघर्ष करुन झोपलेल्या प्रशासनाला ठिकाणावर आणून जनकल्याणासाठी विकासकामे खेचून आणतात आणि माफिया प्रशासनाच्या कामात उडी टाकून त्यात पोळी भाजून स्वत:चे भरणपोषण करतात. बेरोजगार व गरिबांच्या तोंडचा घास पळविण्यात हे कौशल्यपणाला लावत आहे. बेरोजगारांकरिता8 संजीवनी ठरलेली रोहयो मात्र सदोष स्थितीमुळेच बेरोजगार तरुण हे अवैध कामांची शिकार होत आहेत. कोरोनाच्या सावटानंतर आर्थिक परिस्थितीशी सामान्य माणूस धैर्याने सामोरे जात आहे. काही सुशिक्षित तरुण बेरोजगार व मजूरांना तोकड्या मजूरीचे प्रलोभन देऊन त्यांना रात्री-बेरात्री ट्रॅक्टरने अवैध वाहतूक व उत्खनन करण्यास भाग पाडले जात आहे. नद्यांतील नैसर्गिक संपत्तीचे अवैध उत्खनन करुन अनधिकृतरित्या त्यांची शासकीय व विना शासकीय कामासाठी दिवसाढवळ्या बेकायदेशीर पुरवठा करणाऱ्या



स्वयंघोषित माफियांना जणू मोकळे झालेले रान असेच अनूकूल राहिले. अनेक कारवाया होवूनही कुरळपूर्णा येथील रेती घाटाची परिस्थिती बदलली नाही. राजकिय वरदहस्ताने हे सर्वकाही सुरु आहे, हे सुध्दा तेवढेच खरे.

# पीक नुकसानीचे पंचनामे न झाल्याने शेतकऱ्यात रोष

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.15 ) -** अचलपुर तालुक्यात यंदा जून, जुलै, ऑगस्ट या तीन महिन्यांत सततचा पाऊस व अतिवृष्टीने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यातही संत्रा बागांना मोठा फटका बसला असून शेतकऱ्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पंचनाम्यांची मागणी केली. मात्र, अद्याप संत्रा व इतर कुठल्याही पिकांचे पंचनामे झालेले नसल्याने शेतकरी रोष व्यक्त करू लागले आहेत.

मेळघाटच्या पायथ्याचा भाग हा फळबागांचा पट्टा ओळखला जातो. येथे मोठ्या प्रमाणात संत्रा, केळी, सारखी पिके घेतली जातात. यामध्ये अतिवृष्टी झालेली नसली तरी पर्जन्यमान जास्त झाल्याने येथे पिकांचे नुकसान झाले आहे. झालेले नुकसान पाहता शेतकऱ्यांनी वेळोवेळी तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी, जिल्हा कृषी अधीक्षक, उपविभागिय महसूल अधिकारी, जिल्हाधिकारी, आमदार, खासदार, पालकमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना यांना रितसर निवेदन दिले. झालेल्या नुकसानाचे पंचनामे करून भरपाई देण्यात यावी, असे निवेदनात म्हटले. बराचसा कालावधी गेल्यावरही अद्यापपर्यंत पंचनामे झालेले नसल्याने शेतकरी प्रतीक्षेत आहेत.



### तातडीने मदत द्यावी

गेल्या काही दिवसांत सततच्या पावसाचे प्रमाण जास्त झाले आहे. तसेच अतिवृष्टी झाली असून तो अहवाल गृहीत धरून मदत देण्यात यावी. संत्रा उत्पादक शेतकरी नुकसानाबाबत संबंधित विभाग तसेच आमदार, खासदारांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे. सततच्या पावसाचे पाणी शेतात थांबून राहिल्यामुळे पिकांचे फळबागांचे नुकसान झाले. पिकांच्या उत्पादनात होणारी घट, संत्रा पिकावर बुरशीजन्य रोगांमुळे मोठ्या प्रमाणावर फळांची गळती होत आहे. तरी कुठलेही निकष न लावता शासनाने मदत जाहीर करावी अशी मागणी शेतकरी करीत आहे.